**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)** **Media Coordination Cell**
गणेशखिंड रोड, पुणे- ७ Ganeshkhind Road, Pune-7

........................................................................................................................

**प्रसिद्धीसाठी**

२ नोव्हेंबर २०१७

## कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचे आवाहन :

*(विषय - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला 'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स'चा दर्जा मिळवण्याच्या प्रक्रियेत लोकांचा सहभाग)*

देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. त्यासाठी देशात अस्तित्वात असलेल्या शैक्षणिक संस्थांमधून जागतिक दर्जाची अशी वीस 'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स' निर्माण करण्याचा सरकारचा मानस आहे. या संस्थांना अभ्यासक्रमाच्या दृष्टीने तसेच, आर्थिक, प्रशासकीय व इतर प्रकारची स्वायत्तता दिली जाणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची आतापर्यंतची भरीव कामगिरी पाहता या संस्थामध्ये आपल्या विद्यापीठाचा समावेश व्हावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्या दृष्टीने सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

विद्यापीठ हा संपूर्ण समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे, असे आम्ही मानतो. त्यामुळे 'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स' होण्याच्या प्रक्रियेत विद्यापीठाचे विविध भागधारक, विविध क्षेत्रांचे नेतृत्त्व करणारे धुरीण तसेच, सामान्य नागरिकांचाही सहभाग

असायला हवा. त्या दृष्टीने आम्ही विद्यापीठाच्या विविध भागधारकांशी बोलत आहोतच. त्याचबरोबर नागरिकांनीही या प्रक्रियेत सहभागी होऊन विविध मुद्द्यांवर आपली मते व सूचना दिल्या तर विद्यापीठाचा प्रस्ताव अधिक व्यापक व सर्वंकष होईल.

त्यासाठी कुलगुरू या नात्याने मी आवाहन करतो की, पुढील मुद्द्यांवर नागरिकांनी आपली मते व सूचना कळवाव्यात.

१. विद्यापीठाची बलस्थाने काय आहेत?

२. उच्च शिक्षणाच्या दृष्टीने विद्यापीठ कसे असावे?

३. विद्यापीठाकडून आपल्या काय अपेक्षा आहेत?

४. नवीन अभ्यासक्रम काय असावेत?

५. विद्यापीठाचा समाजाशी संवाद कसा आसावा?

६. संशोधन, अध्यापन, लोकांशी संवाद या गोष्टी सुधारण्यासाठी आणखी काय व्हायला हवे?

**आपली मते व सूचनांसाठी ई-मेल** : sppuforeminence@gmail.com

(आपल्या सूचना १५ नोव्हेंबर २०१७ पर्यंत पाठवाव्यात.)

.....................................................................................................................

**अभिजित घोरपडे**

विशेष कार्याधिकारी

माध्यम समन्वय कक्ष

९८२२८४०४३६

abhighorpade@gmail.com

avghorpade@unipune.ac.in